# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-
२९४५१००१

**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्र-३४७/२०२४** **दिनांक-११/०९/२०२४.**

## "Telegram Channel वरील Investment App मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन तक्रारदार यांची फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी ९,९०,०००/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश"

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील मिरारोड पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री.रुपाणी यांनी **Telegram Channel** वर **Investment App** मध्ये गुंतवणुक करुन अधिक नफा मिळत असल्याबाबतची जाहिरात पाहिली. सदर ॲपची पडताळणी न करता तक्रारदार यांनी एकुण १३,३०,०००/- रु ची ॲपमध्ये गुंतवणुक केली. परंतु त्यानंतर तक्रारदार कोणताही परतावा न मिळाल्याने त्यांची आर्थिक फसवणुक झाल्याचे लक्षात आले. सदरबाबत तक्रारदार यांनी तक्रारी अर्ज सायबर पोलीस ठाणे दिल्याने तक्रारीची नोंद घेण्यात आली आहे.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक १०४८-बी/२०२४ अन्वये.)**

तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज प्राप्त होताच झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया खात्यांमध्ये वर्ग झाल्याची माहिती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम वर्ग झालेले खाते तात्काळ गोठविण्याकरीता संबंधीत बँकेंना पत्रव्यवहार करण्यात आले. तक्रारदार यांची रक्कम गोठविलेल्या खात्यातील रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालय यांचेकडुन तसेच संबंधीत बँकेना वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला. सायबर पोलीस ठाणे यांचेकडुन वारंवार पाठपुरावा केल्याने **तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी ९,९०,०००/- रु मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Watsapp, facebook, Instagram** अथवा **Telegram Channel,** वर जास्त परतावा देणा-या **Promotional Adds** वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये **Telegram Channel, Watsapp Group** वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे **Sceenshot, Massages** दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
- **Work From Home** नावाखाली **Online Youtube Vedio Link Task, Hotel/Movie Rating** या सारख्या गुंतवणुक करणा-या फसव्या जाहिरातींना बळी पडु नये.
- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds** मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करुन नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, पोअं/ विलास खाटीक, पोअं/राहुल बन यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**-----------ooooo----------**